# प्रेसनोट दि. ०९/०८/२०१९

## सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखा पुणे शहर यांचेकडुन जुगार अड्ड्यावर छापा

दि.०८/०८/२०१९ रोजी सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे पुणे शाखेकडील पोलीस शिपाई शशांक खाडे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून शेलार वस्ती, शांती नगर, जगताप चौक, वानवडी, पुणे येथे बेकायदेशीर जुगार अड्डा चालु असलेबाबत खबर मिळालेवरून तात्काळ बातमीची पडताळणी करुन वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. भागवत मिसाळ व पोलीस उप निरीक्षक श्री. खडके यांचे मार्गदर्शनाखाली शेलार वस्ती, शांती नगर, जगताप चौक, वानवडी, पुणे येथे चालु असलेल्या बेकायदेशीर मटका अड्ड्यावर छापा टाकुन एकुण ३४,३८०/- रु. किंमतीचा माल त्यामध्ये रोख रक्कम व जुगाराचे साहीत्य (मोबाईल सह) असा माल जप्त करुन जुगार घेणारे व खेळणारे असे एकुण १५ इसमांविरूध्द वानवडी पोलीस स्टेशन गु.र.नं.४४९/२०१९ महाराष्ट्र जुगार ॲक्ट कलम १२(अ) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन सदर गुन्हयामध्ये १४ आरोपी यांना अटक करण्यात आली आहे व १ आरोपी फरार आहे.

वरील नमुद कारवाई श्री.बच्चनसिंग पो.उप.आयुक्त गुन्हे, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.भागवत मिसाळ व पोलीस उप निरीक्षक श्री.खडके यांचेसह सामाजिक सुरक्षा विभागाकडील पो.हवा.क्षिरसागर, पो.ना. चव्हाण, पो.ना. माने, पो.ना. पठाण, पो.शि.खाडे व पो.शि. भांडवलकर यांनी केलेली आहे.